नि.दि.दा.क.१४/२०१५
**रिषी वि. बबन**
**नि. – ८४ खाली**

**पुढील सरतपास प्रतिवादीसाठी श्री ए. एम्. देवळे वकील साहेब शपथेवर सुरुः**

१. मी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. शपथपत्र नि.८४ वर दाखल आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास पुढील तारखेपर्यंत वादीचे वकील श्री एस.जी. रामटेकेयांच्या तोंडी विनंतीवरुन तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

(ओ.जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी
दिंनाकः१७.०७.२०२३

(ओ.जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी

**रिषी वि. बबन**

**<u>वादीतर्फे साक्षदार क्र.१ यांचा सरतपास श्री एस.जी. रामटेके वकील साहेबः</u>–**

२. माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले आहे. मला मराठी लिहीता वाचता येते व वाचलेले समजते. वादी हा माझा भाचा आहे. मला सर्वे क्र.१० व १३८ वाद मिळकतीबाबत पुर्ण माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत माझ्या वडीलांची होती. हे म्हणणे खरे आहे की मी व सकवारबाई अशी दोनच अपत्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी आणि प्रतिवादी क्र. ५ ते ९ हे सर्व सकवारबाईची अपत्ये आहे. सकवारबाई माझ्यापेक्षा वयाने मोठी होती. हे म्हणणे खरे आहे की,सकवारबाई लग्नानंतर नव–यासोबत राहायला गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, सकवारबाईच्या लग्नानंतर माझ्या आई वडीलांचा मृत्यू झाला आहे.

२. हे मी सांगु शकत नाही की, मी एकमेव मुलगा असल्यामुळे माझ्या परिवारामध्ये माझा मानसम्मान आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीवर मी स्वतचा शेत करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, सकवारबाई व हिच्या मुलांवर माझे प्रेम होते. मात्र आता नाही त्यांच्या बद्दल प्रेम राहीले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सध्या वादी माझ्याकडे येत नाही. वादी दावा दाखल करण्यापुर्वी आम्ही एकमेकांकडे येत जात होतो. हे म्हणणे खरे नाही की मी वादीला कधी कधी पैसे किंवा धान्य देत होतो. मला समजायला लागल्यापासून वाद मिळकत वाहत आहे. मी वाद मिळकतीचा शेतसारा भरत होतो असे म्हणणे बरोबर होईल.

३. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकती संबंधी सर्व व्यवहार मी पाहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई वडील मयत झाल्यानंतर सकवारबाई आणि माझे नाव वाद मिळकतीच्या रेकार्डसदरी लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, नि.७६ आणि ७७ वरील ७/१२ उता–यावर सकवारबाई आणि माझे नाव दिसत आहे. मला

दृष्टी दोष नाही चष्म्यातून व्यवस्थित दिसते. सकवारबाईचे नाव खोडण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र.५५ नोंदणी वेळी मी पटवारीनां असे सांगितले होते की, सकवारबाई हिला कोणते ही वारस नाही. हे म्हणणे खरे नाही की, सकवारबाईने वाद मिळकतील हक्क सोडून दिला आहे असे माझे प्रतिज्ञापत्र मी पटवारीला दिले होते. हे मला माहीत नाही की, नि.७४ व ७५ वरील फेरफार नोंदी चुकीची आहे किंवा नाही.हे म्हणणे खरे नाही की, नि.७४ आणि ७५ वरील फेरफार नोंदीमुळे माझे एकटयाचे नाव वाद मिळकतीच्या रेकार्ड सदरी लागले.

४. मी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, वादी तसेच प्रतिवादी क्र.५ ते ९ यांना अंधरात ठेवून वाद मिळकतीची विक्री प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना केली. हे म्हणणे खरे नाही की, सकवारबाईनी वाद मिळकतीतील हक्क कधीही सोडला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सकवारबाईनी वाद मिळकतीतील हक्क सोडला हे मी माझ्या लेखी जबाबात नमुद केलेले नाही. मी लेखी जबाब वाचून सदर मजकुर दखवू शकत नाही. यादाव्यात पटवारीची साक्ष झाली आहे ही बाब मला माहीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पटवारीची साक्ष झाल्यानंतर फेरफार नोंदी चुक दुरुस्ती करण्यासाठी परिच्छेद क्र.२ मधील **अ** अधोरेखीत भाग लबाळीने व खोटेपणाने नमुद केला आहे.

५. हे म्हण्णे खरे आहे की, वाद मिळकत क्र.१० आणि १३८ याची संपुर्ण आराजी मी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना विकली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी विक्री केलेल्या मिळकतीचा मी एकटयाने फायदा घेतला आहे. हे म्हणणे खरे नाही की मला वाद मिळकत संपुर्ण विकण्याचा अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीमध्ये सकवारबाईचा अर्धा हिस्सा होता व तिच्या मृत्यू पश्चात वादी आणि प्रतिवादी क्र. ५ ते ९ यांचा अर्धा हिस्सा आहे. हे म्हण्णे खरे नाही की, माझ्या शपथपत्रात वादीचा किंवा सकवारबाईचा हक्क नाही असे नमुद केलेले नाही. हे म्हणणे

खरे नाही की, माझ्या लेखी बयानात परिच्छेद क्र.५ मधील मजकूर चुकीचा नमुद केला आहे.

प्रश्न. तुमच्या व सकवारबाईच्यात वादमिळकतीची वाटणी झाली नव्हती?

उत्तर. तिचा हक्क नव्हता म्हणून वाटणी करण्याचा प्रश्नच नाही.

न्यायालयाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

**श्रवणोत्तर स्विकृती** **समक्ष**

**(ओ–जे कुलकर्णी)** **( ओ–जे कुलकर्णी )**

**दि.न्यायाधिश क.स्तर,पारशिवनी** **दि.न्यायाधिश क.स्तर,पारशिवनी**

**दिनांकः३०/०९/२०२३**

नि.क्र.८४ खाली